# मैत्र...मित्र.... मैत्री

मित्र, माणसाला आयुष्याच्या कोणत्याही वयात, कोणत्याही वळणावर भेटतो. अगदी बालवयात रांगत असताना, त्याच्या सोबतच्या बाळाशी मैत्री होते. शाळेत असताना मित्र सवंगडी मिळतात. कॉलेजमध्ये दाखल झाल्यानंतर आणि उच्च शिक्षणा दरम्यान मित्र भेटतात, मैत्री जुळते. त्यामुळे माणसाच्या आयुष्यातील मित्र परीवार आणि मैत्री ही अविभाज्य घटक आहे. माणूस जन्माला येतो त्या क्षणापासून, तो आपल्या पालकांमार्फत, त्याच्या नातेवाईकांशी जोडला जातो आणि आपोआप नाते जोडले जाते. त्या नात्यातून आप्तजन निर्माण होतात, ही रक्ताची नाती त्याच्या जन्मापासून त्याच्यासोबत जोडली जातात. पुढे यथावकाश त्याच्या आयुष्याच्या प्रवासात त्याला त्याच्या आप्तजनांच्या नात्यासोबतच गुरुजन, मार्गदर्शक आणि मित्र जोडले जातात. मित्र अथवा मैत्रीण हा फक्त gender biasness असतो पण नातं तर मैत्रीचंच निर्माण होतं. साधारणतः दोन मुलं सहजपणे मित्र होतात तसेच दोन मुली सहज मैत्रिणी होतात, असे असेल तरी मैत्री हेच नातं.

मैत्री  समान वयोगटात स्वाभाविकपणे होते कारण आवडी निवडी, सहज स्वीकार आणि comfort level हा समान दुवा असतो. त्यात बालवयात झालेली मैत्री सहज स्वाभाविक असते. त्यात निष्पाप भाव आणि सहजता असतेच पण त्याचसोबत त्या नात्यात काहीही हेतू नसतो. तसे बघितले तर मैत्रीला वयोमर्यादा नाही, तुमची मनं जुळली, आवडी निवडी जुळल्या, समान विचार असतील की सहजपणे मैत्री निर्माण होते. मैत्री मध्ये राग, लोभ, मोह, माया, मत्सर आणि द्वेष ह्या षड्रिपूंना अजिबात स्थान नाही. इथे फक्त मनं जुळतात, परस्परप्रति प्रेम निर्माण होते आणि मग 'मैत्र' भावना निर्माण होते आणि ' मैत्री ' जुळते आणि 'मित्र' निर्माण होतात. त्या मैत्रीत इतकी सहजता प्राप्त होते की काही formality राहत नाही.

मित्र आणि मैत्र सारखे वाटणारे शब्द भासतात पण त्यात फरक आहे. मित्र ही एक व्यक्ती असते, ज्या व्यक्तीशी आपलं एक मैत्रीचं नातं निर्माण होतं. एक सहज, निष्पाप, निर्हेतुक असलेले आणि चिरकाल टिकणारे हे नाते. आपले  माता, पिता, बहीण, भाऊ आणि आप्तजनामुळे निर्माण झालेली रक्ताची नाती अबाधित असली तरी मित्र आणि मैत्रीचं नातं खूपच खास नातं असते. ह्या नात्यात स्वतःपेक्षा समोरच्या व्यक्तीची, मित्राची जास्त काळजी असते आणि ती काळजी घेतली जाते. मैत्री कोणाशीही होऊ शकते. त्याला वयाचं, नात्याचं, स्त्री पुरुष नात्याचं बंधन नाही. अगदी नात्यातल्या व्यक्तीशी सुद्धा मैत्री निर्माण होते कारण तेथे विचार, आवडी निवडी, समान छंद आणि मन जुळली जातात. बहीण भाऊ, भाऊ भाऊ हे रक्ताच्या नात्याचे असतात पण काही वेळा त्यांच्यामध्ये मैत्री वाढते. मित्र अथवा मैत्रीण कधी होतात त्याला विशेष असं काही निमित्त लागतही नाही मात्र तुमच्या

अडचणीच्या वेळी नकळत तुमच्या मदतीला धावून आलेली व्यक्ती तुम्हाला खूप जवळची वाटते. त्या व्यक्ती सोबत तुमचे ऋणानुबंध जुळतात, मैत्र भावना वाढीस लागते आणि नकळत मैत्री होते.

मित्र कुठेही भेटतात. ते शाळेच्या वर्गात भेटतात, तुमच्या बाल्यावस्थेत भेटतात. लांबच्या प्रवासात भेटतात आणि नकळत घट्ट मैत्री तयार होते मग प्रवास संपल्यानंतर आयुष्यभर साथ करतात. मैत्री आपल्या सहचारिणी अथवा सहचर यांच्या सोबत होते कारण तिथे नात्याच्या पलीकडे मनं जुळली जातात. प्रेमाच्या नात्यासोबतच मैत्रीचं नातं तयार होते. ज्या संसारात नवरा बायको मध्ये मैत्रीचं नात निर्माण होते, त्या संसाराला बाहेरच्या आधाराची गरजच भासत नाही. मैत्रीला वयाची मर्यादा आणि वयाची अटही नाही. बागेत फिरताना तरुण मंडळींची इतर आजी आजोबांसोबत मैत्री निर्माण होते. घरात आई ही मुलीची मैत्रीण होऊ शकते. वडील आणि मुलगा ह्यांच्यात मैत्रीचं नात निर्माण होतं. नातवंडे आणि आजी आजोबा ह्यांच्यात मैत्री निर्माण होऊ शकते. आपले ऑफिस मधील सहकारी आणि बॉस यांच्याशीही मैत्री होऊ शकते.

मैत्री निर्माण होण्यासाठी 'मैत्र' जपणे महत्वाचे. मैत्र ही एक भावना आहे, ते रोवलेले बीज असते. त्याला प्रेम, जिव्हाळा आणि वेळ दिल्यानंतर त्याला अंकुर फुटतात. पुढे ह्या रोपाला काळजी, प्रेम, सहवास ह्याचं खतपाणी मिळाल्यानंतर त्या रोपाचे, मैत्रीच्या वृक्षात रूपांतर होते. मैत्र ही अशी भावना आहे, ज्यात सहजता असतेच पण सहवासाने आणि सहानुभवाने, ते मैत्र त्या नात्यात उतरते. सहवासाने आणि समोरच्या व्यक्तीच्या भावना जाणून, सहनुभवाने ते नातं फुलतं, बहरते. मैत्र ही भावना एकदा रुजली की दररोज भेटायची गरजही नसते. तुमच्या अडीअडचणीला समोरच्या व्यक्तीपर्यंत त्या भावना पोहोचतात आणि अगदी स्वाभाविकपणे तो मित्र अथवा मैत्रीण मदतीला धावून येतो, असा हा सहनुभवाचा समान धागा म्हणजे मैत्र. मैत्र भावनेत एक व्यक्ती दुसऱ्याच्या मनातील भाव आणि विचार समजू शकते. काहीही न बोलता, व्यक्त न होताही, जणू मानकवडा असतो तो मित्र कारण त्याला कारण मैत्र भाव. मैत्र भावना सदोदित मैत्रीत कायम असते.

मैत्र म्हणजे, अगदी मौन बाळगले असले तरी मनातले भाव कळतात. जणू माऊली म्हणतात तसे, 'शब्देविणा संवादू  दुजेविणा अनुवादु ' म्हणजे संवादाची गरजच भासत नाही पण अगदी अनुवाद करायला सुद्धा दुसऱ्या व्यक्तीची गरज लागत नाही अशी ही मैत्र भावना.

'मैत्र' म्हटलं की कृष्ण सुदामा ह्यांची मैत्री समोर येते, किती त्या मैत्रीत सहजता. गरीब सुदामा आपल्या मित्राच्या श्रीकृष्णाच्या भेटीला जातो, तो मित्र द्वारकाधीश पण त्यांच्या भेटीत किती सहजता. एवढा मोठा देव, सम्राट द्वारकाधीश श्रीकृष्ण, त्याला भेटताना सुदामाला काही दबाब वाटला नाही, काही दडपण जाणवले नाही. फक्त मैत्र भावना आणि मैत्रीचं पाठबळ. त्या भेटीत सुदामाने काही मागितलं नाही, फक्त मैत्र भाव अनुभवला. त्या कृष्णाने काही दिलं नाही तरी सुदामाला सगळं

मिळालं जणू. निर्व्याज मैत्री, मैत्र भाव आणि पुन्हा शब्देविण संवाद अनुभवला. त्यांची मैत्री सभोवतालच्या लोकांनी अनुभवली, ह्याला मैत्र भाव म्हणतात.

द्रौपदी आणि श्रीकृष्ण ह्यांच्यात असलेले मैत्र भाव. केशव, श्रीकृष्ण हा अर्जुनाचा सखा, प्रिय मित्र तरीही द्रौपदी आणि श्रीकृष्णात असलेलं नातं, मैत्र भाव एका उच्च पातळीवरच्या मैत्रीचा दाखला देतात. द्रौपदीचा श्रीकृष्ण सखा. तिच्या मनातले भाव ओळखणारा आणि तिच्या प्रत्येक हाकेला धाऊन जाणारा, सखा. त्या दोघांमध्ये असलेलं मैत्र भाव, फारच उच्चकोटीचे. म्हणूनच द्यूत क्रीडेच्या वेळी पांडवांनी सर्वस्व गमावल्यानंतर द्रौपदीला सुद्धा पणाला लावले असताना, वस्त्रहरणाच्या प्रसंगात द्रौपदीचे पराक्रमी पांडव आणि दरबारातील सगळे दिग्गज असहाय अवस्थेत असताना, तिचा सखा श्रीकृष्ण लज्जारक्षणासाठी धावून आला, तेही अदृश्यपणे. स्वतःचं अस्तित्व अबाधित राखत, हाच तो मैत्र भाव.

आपले भक्तजण भक्तीमध्ये आकंठ बुडालेले असताना, त्याच चोखोबाची गुरे राखणारा, एकनाथांची कावड घेऊन जाणारा, पुंडलिकासाठी कर कटावरी ठेवत युगे अठ्ठावीस विटेवरीउभा राहणारा हा पांडुरंग, ह्या भक्तांचा सखा कारण त्यांच्यात मैत्र भाव रुजलेली.

'मैत्र भाव' हा राधा कृष्ण यांच्या नात्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. काय नातं होतं त्या दोघांमध्ये. राधा गोकुळातली विवाहित स्त्री, सामान्य व्यक्ती पण त्या कृष्णाशी, ईश्र्वराशी इतकी एकरूप झालेली की जणू दोन शरीरं आणि एक आत्मा. एकमेकांशी इतकी एकरूपता, जणू बिंब आणि प्रतिबिंब. श्रीकृष्णाच्या मधुर मुरलीचे सूर जणू फक्त राधेसाठी. त्या सुरांनी जणू देहभान विसरून राधा बावरी होत असे असं म्हणतात, राधेच्या गमनानंतर श्रीकृष्णाने कधी मुरली वाजवली नाही. एक अद्वैत भावनांचं नातं. राधा कृष्णाच्या मैत्र भाव अधोरेखित करणाऱ्या ओळी आहेत,

" बिंब होते राधेचे
प्रतिबिंब ते कृष्णाचे
मनी बिंबले दोहांचे
तनापारचे नाते ।
अद्वैताची साक्ष याहूनी
असेल कुठली सांगा
काठावरती दिसेल राधा
पाण्यातील श्रीरंगा ॥ "

**- मनोज मोहन कुरुंभटी**